

# वादग्रस्त मेट्रो-३ची आज चाचणी

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) – पर्यावरणास धोकादायक ठरणारे 'कारशेड' आरेच्या जंगलात करण्याचा निर्णय वादग्रस्त ठरलेला असतानाच कुलाबा–वांद्रे–सीप्झ भुयारी मेट्रो-३ ची उद्या ट्रायल रन होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मेट्रो-३ ची ही ट्रायल होणार आहे. आरेच्या सारीपुत नगर येथील ट्रॅकवरती ही चाचणी करण्यात येणार आहे. या चाचणीसाठी आंध्र प्रदेशातील श्रीसिटीतून अल्स्टॉम कंपनीचे आठ डबे ▮ पान ८

# मेट्रो ३ची आज चाचणी

*(पान १ वरून)* गेल्याच महिन्यात मुंबईत दाखल झाले आहेत. सकाळी ११ वाजता आरेच्या सारीपुत नगर येथील ट्रॅकवर ही चाचणी होणार आहे.

मेट्रो–३ चे भुयारीकरणाचे काम ९० टक्के झाले आहे, तर एकूण प्रकल्पाचे काम ७० टक्के झाले आहे. मात्र, कारशेडबाबत निर्णय झालेला नसल्याने मेट्रो–३ चे भवितव्य अंधारातच आहे. कारशेड निर्णयाच्या विलंबामुळे मेट्रो–३ ची डेडलाइन साधारणपणे दोन–तीन वर्षांनी पुढे जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.